- बायको -

बायको म्हणजे बायको म्हणजे बायको असते
कधी मंद दिव्याची वात तर कधी पेटलेली मशाल असते ॥
ती जेंव्हा घरात असते, माझं तिच्याशी अजिबात पटत नाही
ती जेंव्हा घरात नसते, मला जरासुध्दा करमत नाही ॥
पाणी, धोबी, दूधवाला, पेपरवाला, नाडाळ शेजाऱ्याला
तीच व्यवस्थित हाताळू शकते. ॥
घरात कुणाची, कुठली वस्तू कुठे आहे ?
बँकबुक, लॉकरच्या चाव्या, हातरुमाल कुठे आहे ?
कुणाचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस कधी आहे
सारी नोंद तिच्या मेंदूत पक्की असते. ॥
आला गेला पै पाहुणा सर्वांचच ती मनापासून स्वागत करीत असते
कोण आचरट, कोण हावरट कोण बावळट, कोण भला
प्रत्येकाची नवी ओळख तीच करून देत असते ॥
मुलाचा अभ्यास, गृहपाठ, पालकसभा तीच अटेंड करीत असते
विविध कर्जे, कशाकशाचे हप्ते, सणवार, लग्नकार्य, देणी घेणी
अनेक आघाड्यांवर एकाच वेळी तीच लढा देत असते ॥
सासूसासरे, आईवडिल, दीर, जाऊ, नणंदा आणि वहिनी
सर्वांबरोबर समभावाने ती वागत असते. ॥
सर्वांशी गोड बोलून चांगुलपणा मी घेतो
नको तिथं नको तेवढे खरं बोलून वाईटपणा ती घेत असते ॥
वाहन मी चालवत असतो शेजारी ती बसलेली असते
घ्या डावीकडे, घ्या उजवीकडे, सतत मला सांगत असते
म्हैस आली सांभाळा, त्या बाईकडे काय बघत बसलात
टाका गीअर, व्हा पुढे, सतत सूचना देत असते ॥
घराच्या दारावर नेमप्लेट माझी असते
पण घराच्या आत तिचीच अनिर्बंध सत्ता असते
तिच्याच इशाऱ्यावर अवघे घरदार नाचत असते ॥
फुटकं माझं नशीब, चांगली स्थळं सोडून तुमच्या घरी आले
केवळ मी म्हणून सोसलं सारं, आजवर इथे टिकून राहिले
तुमची काय, माझी काय, प्रत्येकाची बायको हेच म्हणत असते ॥